NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

# कंत्राटी पदभरती जाहिरात

## राष्ट्रीय आरोग्य अभियान

पुणे परिमंडळ, पुणे, महाराष्ट्र

**राष्ट्रीय आरोग्य अंतर्गत अंतर्गत खालील कंत्राटी रिक्त पदे संवर्गनिहाय भरावयाची आहेत.**

जाहिरात दिनांक १७/०७/२०२५

NATIONAL HEALTH MISSION, MAHARASHTRA
NHM
राष्ट्रीय आरोग्य अभियान
महाराष्ट्र

**तक्ता अ**

| अ. क्र. | पदाचे नाव | रिक्त पदे | नियुक्तीचे ठिकाण कार्यक्रम नाव | वयोमर्यादा | शैक्षणिकअर्हता | संवर्ग | एकत्रित मानधन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | औषध निर्माण अधिकारी (Pharmacist) | १ | राष्ट्रीय आरोग्य अभियान, उपसंचालक, आरोग्य सेवा पुणे मंडळ पुणे | खुला ३८ व राखीव ४३ (NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल) | D.Pharm / B.Pharm, MS-CIT आवश्यक, एनएचएम / शासकिय अनुभवास प्राधान्य | खुला-१ | रु. १७,०००/- |
| २ | समुपदेशक (Counsellor) | १ | राज्य क्षयरोग नियंत्रण व प्रशिक्षण केंद्र पुणे | खुला ३८ व राखीव ४३ (NHM कर्मचारी ५ वर्षे शिथिल) | Bachelors (or equivalent) Degree in Social Work/Sociology/Psychology Preferential Qaulification 1) Masters degree/PG Diploma in Social Work/ Sociology /Psychology 2) Experience in NTEP or worked as counsellor 3) Basic knowledge of computers | खुला-१ | रु. २०,०००/- |
| ३ | एक्सरे टेक्निशियन (X-Ray Technician) | १ | | | 10+2 with diploma in Radiology or X-Ray (Relevant Approved University by UGC) | खुला -१ | रु. १७,०००/- |

**अटी व शर्ती:-**

१) उपरोक्त पदे ही कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती ११ *महिने २९ दिवस* करीता असेल.

२) जाहीरातीतील पदे राज्य शासनाची नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) **जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो तसेच नियुक्तीच्या ठिकाणामध्ये बदल होऊ शकतो, याबाबतचे सर्व अधिकार मा. उपसंचालक, पुणे मंडळ, पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.**

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

७) एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास उमेदवारांनी प्रत्येक पदाकरीता स्वतंत्र अर्ज सादर करावेत.

८) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

९) जाहीरातीच्या दिवशी सदर पदासाठी कमाल वयोमर्यादा अराखिव प्रवर्गासाठी ३८ वर्षे व राखीव प्रवर्गासाठी ४३ वर्षे राहील. तसेच एनएचएम अंतर्गत काम कलेल्या अथवा करीत असलेल्या उमेदवारांना ५ वर्षे वयोमर्यादा शिथील राहील.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन **गुणानुक्रमे** यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे/पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार मा.उपसंचालक,आरोग्य सेवा पुणे मंडळ पुणे यांचे स्तरावर राखिव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१३) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज, गुणपत्रिका व आवश्यक कागदपत्रांच्या छायांकीत सत्यप्रतींसह आपले अर्ज ऑफलाईन पध्दतीने **दि.१७/०७/२०२५** ते **दि.२४/०७/२०२५** रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पुणे परिमंडळ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, विधान भवन समोर, पुणे ४११००१ येथे कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टी वगळता) आणुन द्यावे.

१४) प्रक्रिया शुल्क अधिक शासकिय कर अदा केल्यानंतरच उमेदवारांचा अर्ज भरती प्रक्रियाकरिता गृहित धरणेत येईल.

१५) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील.सदर अंतिम निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाइटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

१६) अर्जासोबत उमेदवारांनी परिक्षा शुल्क रक्कम रु.३००/- रुपयांचा डिमांड ड्राफट **Deputy Director Health Services Pune** यांच्या नावे काढावयाचे आहे. अर्जासोबत डिडी जोडायचा आहे.

१७) सदर भरती प्रक्रिये करीता अर्ज **दि.१७/०७/२०२५** ते **दि.२४/०७/२०२५** पर्यंत राष्ट्रीय आरोग्य अभियान, राष्ट्रीय आरोग्य अभियान, पुणे परिमंडळ, पुणे नवीन प्रशासकीय इमारत, तिसरा मजला, विधान भवन समोर, पुणे ४११००१ येथे कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टी वगळता) ऑफलाईन पद्धतीने स्वीकारले जातील तसेच इतर कोणत्याही पध्दतीचा अवलंब करणेत येवू नये याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. याबाबत पुनश्च वर्तमानपत्रामध्ये जाहीरात दिली जाणार नाही.

१८) उमेदवारांना वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी कार्यालयीन सुचना फलकावर व https://nhm.maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

१९) मा. उपसंचालक पुणे मंडळ पुणे यांच्या सुचनानुसार रिक्त पदासाठी आरक्षित संवर्गातील उमेदवार उपलब्ध नसलेस इतर संवर्गातील उमेदवारांस नियमानुसार नियुक्ती दिली जाईल.

२०) **पद क्रमांक १ ते ३ (औषध निर्माण अधिकारी, समुपदेशक, एक्सरे टेक्निशियन) या पदांसाठी पात्र उमेदवार यांचेकडून विहित नमुन्यात अर्ज मागवून घेऊन तक्ता ब नुसार पदभरती प्रकिया राबविण्यात येणार आहे.**

**राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषगाने राबविणेची प्रक्रिया**

**पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.**

**तक्ता ब**

| विवरण | तपशील | अधिकतम गुण |
|---|---|---|
| पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे) | मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००=३०) | ५० गुण |
| पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी. | अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे (उदा. १. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त | २० गुण |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| | B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारांस B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion =६०*२०/१००=१२ गुण) | |
| संबंधित पदाशी निगडीत अनुभव | प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३०गुण) | ३० गुण |

१. यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी कार्यालयीन सुचना फलकावर व https://nhm.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता पाच दिवसाची मुदत देणेत येईल. आक्षेपसोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेत येईल.

२. अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवता यादी तयार करणेत येईल व त्यानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

३. ज्या पदांकरीता कौशल्य चाचणी अनिवार्य करण्यात आली आहे त्या पदांकरीता पात्र उमेदवारांस नियुक्ती आदेश देण्यापूर्वी त्याची परिमंडळस्तरावर कौशल्य चाचणी घेण्यात येईल. सदर कौशल्य चाचणीमध्ये सदर उमेदवार पात्र ठरल्यास त्यास नियुक्ती आदेश देण्यात येतील अन्यथा नाही.

४. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

❖ खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.

१) शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका
२) राखीव उमेदवारांनी जातीचे प्रमाणपत्र
३) शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला
४) प्रमाणित केलेले अनुभव प्रमाणपत्रे
५) पासपोर्ट आकाराचा फोटो
६) शासकीय अनुभव असलेस अनुभव दाखला
७) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
८) नावात बदल असलेस गॅजेट(राजपत्र) जोडणे

(डॉ.प्रशांत वाडीकर)
**उपसंचालक, आरोग्य सेवा,**
**पुणे मंडळ पुणे**

Scanned with OKEN Scanner

# अर्जाचा नमुना

................................................ या पदासाठी अर्ज

| पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकीत फोटो |
|---|

प्रति,
**मा. उपसंचालक,**
आरोग्य सेवा, पुणे परिमंडळ, पुणे

१) **संपुर्ण नाव** **मराठी** **इंग्रजी (कॅपीटल लेटर)**

- आडनाव:- ......................................... .......................................
- स्वत:चे नाव ......................................... .......................................
- वडीलांचे/पतीचे नाव ......................................... .......................................
- आईचे नाव ......................................... .......................................

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोडसहीत:-
........................................................................

३) **मोबाईल क्रं:-**.................................. मेल आयडी....................................................

४) **जन्मतारीख:-**.................................. दि. /०७/२०२५ रोजीचे वय:-.........वर्षे.........दिवस

५) कोणत्या प्रवर्गातुन अर्ज केलेल्या आहे त्याप्रमाणे खालील चौकटीमध्ये फक्त एकावरच अशी (✓) खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा.अ. | भ.ज.ब. | भ.ज.क. | भ.ज.ड. | वि.मा.प्र. | इ.मा.व. | आर्थिक मागास प्रवर्ग | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| SC | ST | VJ-A | NT-B | NT-C | NT-D | SBC | OBC | EWS | Open |
| | | | | | | | | | |

६) **शैक्षणिक अर्हता:-**

| अ. क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | विद्यापीठ/मंडळाचे नाव | परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष | किती पैकी गुण उदा:- ५००/३५० | टक्केवारी | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

७) **अनुभव:- (केवळ शासकिय/निमशासकिय / खाजगी)**

| **संस्थेचे नाव** | **संस्थेचा प्रकार (शासकिय/निमशासकिय / खाजगी)** | **कालावधी** | | **एकुण वर्षे** | |
|---|---|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत | वर्षे | महिने |
| | | | | | |

Scanned with OKEN Scanner

८) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? चौकटीमध्ये अशी खुण करावी

| होय | नाही |
|---|---|

होय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती ज़ोडलेल्या आहेत.

१) ........................................................................

९) **अर्जदार सदयस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत आहे काय?होय/नाही असल्यास मुळ कार्यालयाचे नाव व पदनाम ............................................................**

**मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.**

**सही/-**

**नाव:-**

Scanned with OKEN Scanner

## लहान कुटूबांचे प्रमाणपत्र - नमुना अ

(NHM कडील दि.२३/०७/२०२० रोजीच्या परिपत्रकान्वये)

मी श्री/श्रीमती/कुमारी ______________________________

श्री. ______________________________ यांचा/यांची

मुलगा/मुलगी/पत्नी वय …… वर्षे, राहणार ______________________________ याव्दारे

पुढील प्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी ______________________________ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला ……… (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २३ जुलै २०२० यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ……… इतकी आहे. (असल्यास जन्म दिनांक १) / /२० . २) / /२० .

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २३ जुलै २०२० व तद्‌नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे शासकिय नियमानुसार मी या पदासाठी अपात्र ठरेल यांची मला जाणीव आहे.

**ठिकाण :- पुणे** **अर्जदार स्वाक्षरी :- … … … … … … … … … … … … … … … …**

**दिनांक :- / /२०२५.** **अर्जदाराचे नाव :-** ______________________________

**(टिप :- वरील लहान कुटूंबांचे प्रमाणपत्र सर्व उमेदवारांनी भरावे. उमेदवार अविवाहीत असल्यास, प्रमाणपत्रातील इतर माहिती भरुन अपत्य संख्या शुन्य (०) अथवा निरंक नमुद करावी.)**